बोधपाठ



डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

उपासनेसाठी नित्यपाठ

बोधपाठ

(साधकांच्या वाचन, मनन, चिंतनासाठी
२७ अभंग व विश्वात्मकाची आरती)

डॉ. सुहास पेठे
एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* **बोधपाठ** *
पुस्तकरूपाने प्रकाशित आवृत्ती तिसरी : नोव्हेंबर, २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : **www.pethekaka.com**
युट्यूब चॅनेल : **Shri Pethe Kaka**
अँड्रॉईड ॲप : **SadhanNandadeep** (साधननंदादीप)

प्रास्ताविक

माणसाचं जीवन मुळातच इतर सजीव सृष्टीपेक्षा वेगळं आहे. त्यात दोनही क्षमता आहेत - विनाश आणि विकास. या दोन्हींमधला फरक ओळखण्याची क्षमताही त्याच्यात आहे. जे निवडील ते तडीला नेऊन स्वतःचाच काय इतरांचाही विनाश करण्याची क्षमता त्याच्यात आहे. तीच गोष्ट विकासाचीही आहे. स्वतःचा विकास साधून सूक्ष्म असलेला उद्धार करून घेण्याची क्षमताही त्याच्यात आहे, इतरांचा करण्याचीही आहे. पैसा, भौतिक सुखसाधनं, चंगळवाद, माणुसकीचा होत चाललेला ऱ्हास - हे दुर्दैवानं आज विचार करणाऱ्या माणसांना अस्वस्थ करणारं चित्र आहे. त्यावर सुदैवानं कुणी विचार करणारं, प्रयोग करणारं भेटलं, तर त्याला वस्तुस्थितीच्या बोधाला मदत करणारा आणि मार्ग सुचवणारा हा आजच्या काळचा बोधपाठ !

श्रीकृपेनं ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाच्या समओवीच्या समाप्तीच्या वेळी हे बोधपाठाचे अभंग येत गेले तसे प्रसाद म्हणून दिले आहेत. एरवीचा मात्रा-वृत्त इ. लेखन-संस्कार अर्थातच हेतुतः टाळला आहे, हे लक्षात घेऊन कृपाळू वाचकांनी क्षमा करावी, ही विनंती.

।।श्री।।

माणसात आपलं ध्येय ओळखण्याची क्षमता आहे. ते गाठण्यासाठी लागणारा मार्ग शोधणं, त्यासाठी विचार करणं याही क्षमता त्याच्यात आहेत. अडचण ही की, हे सारं तो जसं स्वतंत्रपणे करू शकतो, तसं हे करताना तो कळत नकळत कशानंही प्रभावित होऊ शकतो. चुकीची ध्येयं निवडली जाऊ शकतात. त्यानुसार चुकीचे विचारही तो करतो. अशाश्वत गोष्टी ध्येय ठरल्या की, अर्थातच त्याची वाटचाल विनाशाकडं होते. ते टाळायला कमी पडतो, तो अशाश्वत सुखामागं धावणाऱ्या जगाबद्दलचा आणि शाश्वत सुख देऊ इच्छिणाऱ्या जगदीशाबद्दलचा विचार आणि त्यासाठी घ्यावा लागणारा शोध ! त्यासाठी भगवंताच्या कृपेच्या बोधाची सुरुवात सार-असाराचा विचार करायला लागूनच करता येईल. तो बोध मनात ठसायचा असेल, तर सतत असार, हे असार म्हणून ओळखत राहिलं पाहिजे, तर सार हे,सार म्हणून सदैव आठवीत आणि आचरीत राहावं लागेल. तर शाश्वत समाधानरूप नारायण जोडला जाईल. सर्वांनी मिळून हे काम करूया, याचं स्मरण देणारं हे धृपद ! तसंच कृपेचा घडलेला बोधपाठ टिकवण्यासाठी शेवटची 'विश्वात्मकाची आरती' !

।। श्री ।।

।। बोधपाठ ।।

बोधपाठाचे हे सार ।
काही करूया विचार ।।
पाहू शोधूनी आपण ।
जोडेल का नारायण ।।धृ।।

-- १ --

माणसाचं आयुष्य यंत्रयुगानं जसं सुकर केलं, तसंच ते नकळत अतिवेगवानही केलं. त्यात त्यामुळं पडणारी बेकारीची भर, दुसऱ्या बाजूनं नवनव्या शोधांमुळं मिळणाऱ्या सुखसाधनांची ओढ, त्यात अमर्यादपणे वाढणाऱ्या लोकसंख्येचा दबाव-अशा अनेक गोष्टींमुळं धावपळीच्या झालेल्या या आयुष्यात माणसाला स्वतःकडं, स्वतःच्या-कुटुंबाच्या स्वास्थ्याकडं बघायला फुरसत नाही तर, ती देवाकडं पहायला कुठून मिळावी ? अशा धावपळीच्या आयुष्यातही क्वचित एखादा विसाव्याचा क्षण माणसाला खऱ्या स्वास्थ्याचा, ते देणाऱ्या परमेश्वराचा विचार करायला मिळून जातो. अशा क्षणी सगळ्या उपाधी बाजूला ठेवण्याची आपल्याला सद्‌बुद्धी झाली आहे, तर निदान एवढं तरी विचारावं की, ज्या संसाराच्या सागरात मी सदैव बुडलेला आहे, तो सागर कुणाचा, त्याच्या पैलतीरी काही आहे का, तो जो कुणी या सगळ्याचा कर्ता भगवंत असेल, त्याच्याकडं आपलं या साऱ्या आयुष्यभराच्या पळापळीत लक्ष नसतानाही, त्याचं आपल्यावर प्रेम कसं टिकून राहात असेल ? त्याची उत्तरं शोधली तर वाटेल 'तुमचे कळो मज प्रेम' !

-- १ --

आज जाहली सद्‌बुद्धी ।
ठेवू बाजूस उपाधी ।।१।।

थोडा चित्ती देऊ ठाव ।
स्मरण्या देवा तुमचे नाव ।।२।।

वेळ काढुनी विचारी ।
कोठे राहतोसी हरी ? ।।३।।

संसाराच्या या सागरी ।
कोण राहे पैलतीरी ? ।।४।।

दीन म्हणे राम राम ।
तुमचे कळो मज प्रेम ! ।।५।।

-- २ --

सततच्या धावपळीच्या वर्षानुवर्षांच्या आयुष्यात स्वतःचा चाळिसावा, पन्नासावा किंवा विवाहिताच्या आयुष्यात कधी विसावा, पंचविसावा असा वाढदिवस यावा आणि त्यादिवशी अचानक काही क्षण मोकळे मिळून मागचं आयुष्य किती नकळत आणि त्याअर्थानं अनेकदा बेसावधतेत गेलं, याची एकदम जाणीव व्हावी तसंच एरवीही कधीतरी होतं. त्यावेळी आजवरचे इतके हजारो दिवस साधं सूर्यदर्शन किंवा आकाशदर्शनसुद्धा न होता कसे उगवले आणि मावळून निसटून गेले, याची सावध करणारी जाणीव होते. या साऱ्या रूपानं वावरणारा परमेश्वर असा चुकून लक्षात आला, समोर आला तर, तो चांगल्या अर्थानं, पण एक धक्काच असतो. बेसावध आयुष्याच्या सवयीमुळं आकाशाकडं बघायलासुद्धा वेळ नसल्यानं अशावेळी एकदम आकाश दिसलं तर, इतकी वर्षं ते रोज तिथंच होतं का, असा नंतर आपल्यालाच चुकीचा वाटणारा, प्रश्न पडतो. धावपळीत जगणाऱ्या इतरांचीही अवस्था तीच असते. आकाश एकवेळ दूर असेल पण आपल्याला नित्य सोबत करणारा चैतन्यरूप परमेश्वर, बेसावधपणामुळं असाच दुरावला आहे, 'तैसे झाले जिवाशिवा' !

-- २ --

कोठे उजाडे दिवस ।
कशी सरती वर्षेमास ।।१।।

नसे दिशांचेही भान ।
नसे सूर्याचे दर्शन ।।२।।

कधी चुकून पाहावे ।
आम्हा नभ वाटे नवे ।।३।।

रोज असते का ते तेथे ।
एक विचारी दुज्याते ।।४।।

दीन म्हणे रे माधवा ।
तैसे झाले जिवाशिवा ।।५।।

-- ३ --

पोटासाठी, देहाच्या सुखासाठी, पैशासाठी, अनंत नवनव्या सुखसाधनांसाठी पळतापळता, जर असा एखादा दिवस उगवला आणि असे विचार मनात आले, तर इतर कुणाहीपेक्षा माझी काळजी घेणारा आणि कुणाहीपेक्षा जवळ असणारा परमेश्वर, म्हणजे त्याअर्थानं देवत्व-दैवी गुण मला का दुरावले, याचा अधिक विचार सुरू होतो. त्यावेळेला प्रथम लक्षात येतं की, माझ्या मूलभूत गरजा या नैसर्गिक आहेत. त्याची तृप्तीही नैसर्गिक आणि मर्यादित आहे. त्यासाठी लागणारे कष्टसुद्धा खरंतर मर्यादितच असायला हवेत. पण जसा एखाद्याला भस्म्या रोग झाला, तर त्यावेळी त्याचं पोट कितीही खाल्लं तरी भरत नाही, तशी आमच्या मनाची स्थिती झाली आहे. अन्नपाणी, वस्त्रनिवारा तर सोडाच, पण हे सगळं मिळालं तरी अजून असंख्य वस्तू, सोनं, अमाप पैसा-असल्या कशानंही या मनाची तृप्ती होत नाही. लहान मुलानं हावेनं 'अजून अजून हवं' म्हणत राहावं, तसं आपलं मन या बाबतीत म्हणत राहातं, म्हणून ही अवस्था आली. आश्चर्य हे की, अशी न पुरणारी हाव असणाऱ्या मनाला, देवाच्या बाबतीत मात्र, 'तुझी हाव नाही त्यासी' असं दुर्दैवानं म्हणावं लागतं !

-- ३ --

पोटासाठी करिता कष्ट ।
झालो देहासी एकनिष्ठ ।।१।।

तुम्ही दिले पोट थोडे ।
आम्ही प्रगती केली पुढे ।।२।।

अन्नपाण्याने भरेना ।
तृप्ती कशाने घडेना ।।३।।

वस्त्रे सोने वस्तू नाना ।
हाव पैशाने पुरवेना ।।४।।

दीन म्हणे केशवासी ।
तुझी हाव नाही त्यासी ।।५।।

-- ४ --

निसर्गाला स्वतःचं चक्र आणि जीवनपद्धत आहे. एक मन आणि त्यामार्गे ईश्वरप्राप्ती ही जादा देणगी वापरणं सोडलं, तर बाकीच्या आपल्या रोजच्या आयुष्याला, निसर्गाचा भाग म्हणून निसर्गाशी सुसंवादी राहाणं, जपणूक करणं, उपकारांची परतफेड करणं, असं वळण हेही उपजतच आहे. पण कृत्रिम जीवनाला, कृत्रिम आनंदाला भुलल्यामुळं, आपलं निसर्गाशी हे आनंददायी नातं रक्तात असूनही, कसं तुटत गेलं, हे लक्षात येईल. वास्तविक, आपल्याला या निसर्गाच्या किंवा त्याच्या निर्मात्याच्या, उपकारांची जाणीव जागृत ठेवता यावी, अशी जीवनपद्धतसुद्धा पूर्वजांनी घालून दिली होती. कृत्रिम आनंदाला भुलू नये आणि आपल्या नैसर्गिक सहज आनंदाच्या भाग्याला विसरू नये म्हणून, रोज सगुणातला आणि अंतरातला देव प्रकाशित करणारी ज्योत उजळण्यापासून अनेक संस्कार अक्षरशः आंदण-भेट म्हणून मिळाले होते. त्याकडं दुर्लक्ष झालं. कृत्रिमतेनं अस्वास्थ्य आलं. आता निसर्गाशी माझं असलेलं नातं पुस्तकात शिकण्याची वेळ माझ्यावर आली. हे वास्तव पाहिलं, तर भानावर येऊन देवाला म्हणावं लागतं, 'दावा अभाग्यासी दया' !

-- ४ --

मिळे संस्कार आंदण ।
त्याचे आम्हा नाही भान ।।१।।

रोज दिव्यातली ज्योत ।
होती देव प्रकाशित ।।२।।

सृष्टी जशी माझ्यासाठी ।
मीही होतो सृष्टीसाठी ।।३।।

आता शिकतो ग्रंथात ।
नाते माझ्या जे रक्तात ।।४।।

दीन म्हणे रामराया ।
दावा अभाग्यासी दया ।।५।।

-- ५ --

धावपळीच्या युगात मी स्वतःकडं पाहायला विसरलो, संस्कारांचं, त्यामुळं होणाऱ्या आनंदाचं, निसर्गानुकूल जीवनाचं महत्त्व विसरलो, हे खरं. पण हे कुणा एकट्या माणसामुळं झालं नाही. देहबुद्धी-देहसुखं-साधनं-स्वार्थ यांची एक फार मोठी लाट आली. त्यात आपल्यातलीच नव्हे, तर देशविदेशातली मोठमोठी माणसंसुद्धा मनानं वाहून गेली. त्या लाटेवर जगणाऱ्या अगणित लोकांनी, स्वार्थ पाहणाऱ्यालाच शहाणं ठरवलं. निसर्गाचा, देवाचा, परमार्थाचा विचार करणाऱ्याला त्याअर्थानं अडाणी ठरवलं. त्या लाटेचा परिणाम होऊन, स्वतःपुरतं पाहण्याची पिढ्यान्‌पिढ्या सवय लागली. तिच्या रेट्यामुळं मीही स्वार्थ पाहणं, हेच शहाणपण समजू लागलो. खरंतर, स्वार्थ म्हणजे आपलीच दृष्टी संकुचित करण्यासारखं आहे. प्रत्येकानं स्वार्थ पाहिला, तर प्रत्येकालाच दुसऱ्याचं भय वाटत राहील-पशुजीवनासारखं. निःस्वार्थीपणानं जगण्यातला परमानंद कळायला दूरदृष्टी लागते. ती गेल्यामुळं आता तिची किंमत कळायला निःस्वार्थानं मिळणाऱ्या अशा परमानंदाच्या अनुभवाचीच गरज आहे. मग स्वार्थापलीकडं जाता येईल, म्हणून 'थोड्या दावी परमानंदा' !

-- ५ --

ज्यांचे स्वार्थाचे पाहाणे ।
जगी ठरती ते शहाणे ।।१।।

सदा जवळ पाहून ।
गेली दृष्टी मंदावून ।।२।।

आता स्वार्थ अपरिमित ।
एक जीव दुज्या भीत ।।३।।

जगणे हवे आनंदाचे ।
दृष्टी पाहू दे दूरचे ।।४।।

दीन म्हणे रे गोविंदा ।
थोड्या दावी परमानंदा ।।५।।

-- ५ --

स्वार्थ ही सध्या जीवनपद्धत झाली. त्यामुळं माझ्यापुरतं पाहाणं हा जसा एक दुष्परिणाम झाला, तसा आपण मिळवलेल्या गोष्टींचा अहंकारही झाला. त्यामुळं माझं वेगळेपण आलं आणि ते जपणंही आलं. आपण जे जे केलं असेल, ते अर्थातच नुसतं असून चालत नाही, त्याला इतरांनी दाद दिल्याशिवाय अहंकार सुखावत नाही. त्यामुळं आयुष्यात जे काही आपण केलं असेल, ते कसं वेगळं आहे आणि त्याचं कौतुक जगाकडून कसं होईल, हे पाहाण्याकडं माणसाचा नकळत कल झाला, आयुष्यातला मोलाचा वेळ जाऊ लागला. सर्व जगाच्या पटलाचा विचार केला, तर सामान्य माणसांचं वेगळेपण किंवा मिळकती तर सोडाच, पण वेगवेगळ्या कारणांसाठी जगात प्रसिद्ध झालेल्या लोकांचं वेगळेपण नकाशातल्या ठिपक्याएवढंसुद्धा टिकत नाही. तिथं असला फोल अहंकार किंवा त्याला दाद मिळवण्याच्या कल्पना अखेर बालिश, दुःखद ठरल्या तर त्यात काय नवल ? खरी मोठी माणसं, त्याअर्थानं मौलिक कार्य करूनसुद्धा, त्याला नगण्य समजतात, नम्र राहतात-त्यामुळं आनंदी राहतात. त्यासाठी प्रार्थना आहे 'माझी ओळख द्यावी मला' !

-- ६ --

किती वाटे प्रपंचात ।
मी तो वेगळा जगात ।।१।।

माझे गर्वाचे घरकुल ।
जो तो आधी ते पाहील ।।२।।

येता जाता तो म्हणेल ।
असे कोठेही नसेल ।।३।।

धूळकणांची मोजणी ।
विश्वी करील का कोणी ? ।।४।।

दीन म्हणे रे विठ्ठला ।
माझी ओळख द्यावी मला ।।५।।

-- ७ --

स्वार्थ, संकुचितता, बालिश कल्पना आणि साऱ्यामुळं होणारं दुःख, यांची जर मला नीट कल्पना आली असेल, तर त्यातून मोकळं होण्यासाठी आणि खऱ्या आनंदासाठी - काय करावं, याचा विचार सुरू होईल. अर्थातच तो विचार लाटेसारख्या जाणाऱ्या चुकीच्या जगरहाटीकडं बघून करता येणार नाही. त्याची सुरुवात माझ्यापासून, निसर्गानं मला दिलेल्या मौलिक देणग्यांपासून आणि त्यांच्या वापराकडं सावधपणानं पाहण्यापासून-करावी लागेल. एकदा आपल्याला मिळालेल्या गोष्टींचं मोल कळलं, त्यांचा आनंदासाठी-उद्धारासाठी-मग इतरांसाठी करायचा वापर कळला, तर आपला चुकीचा प्रवास आता योग्य दिशेनं सुरू करता येईल. पशुपक्ष्यांपेक्षा माणसाला अनेक गोष्टी आणि त्यांच्या उपयोगाचं आकलन करून घेण्याची क्षमता दिली आहे. म्हणून तोच या गोष्टी देणाऱ्या ईश्वराला जाणू शकतो. ते जाणण्यासाठी त्याला ओळख घडण्याचं पहिलं साधन ईश्वर श्रवण-दर्शन. त्यात कमी पडू नये, म्हणून डोळेकान दोनदोन दिले आहेत. त्याचा चुकीचा वापर टाळण्याची विनंती करून म्हटलं आहे की, 'दिले त्यास ऐके पाही' !

-- ७ --

निरंतर तुझिया श्रवणा ।
खंड न व्हावा दर्शना ।।१।।

हृदयी साठण्या चिंतन ।
डोळे कान दिले दोन ।।२।।

देण्यामागे तुझा भाव ।
कधी जाणे दुबळा जीव ? ।।३।।

देव सोडी, जग पाही ।
त्याला अपुरे आयुष्यही ! ।।४।।

दीन म्हणे सावध होई ।
दिले त्यास ऐके पाही ! ।।५।।

-- ८ --

निसर्गानं डोळेकान दोनदोन द्यावेत आणि जीभ मात्र एकच द्यावी, यामागचा देणाऱ्याचा हेतू जर जाणला, त्यानुसार त्याचा वापर करू शकला, तर आज माणूस ज्या अस्वास्थ्यात जगतो, त्यात जगण्याची वेळ त्याच्यावर येणार नाही. श्रवण, दर्शन यांत खंड पडून देवत्वाचं ध्येय आणि जाणीव यांत उणीव येऊ नये, हा हेतू लक्षात आला, तर वापर आणि अर्थातच देवत्वाच्या निरंतर भानामुळं येणारा आनंद तो मिळवील. याउलट ज्या जिभेला चव पाहाणं, ख्राणं, बोलणं अशी असंख्य कामं आहेत, ती जीभ मात्र एकच द्यावी, यात आपल्याच सावधतेची परीक्षा आहे. त्यातलं आपलं एक बोलण्याचं काम पाहिलं, त्यातले विषय पाहिले, तर भगवंत, जरूरीची कामं याऐवजी प्रापंचिक आत्मस्तुती, इतरांची निंदा अशा कामी तिचा वापर करताकरता, देवाचं नाव उच्चारायलाही तिला वेळ उरत नाही. वास्तविक, ज्यानं ती दिली त्याच्या नामाचा तिला छंद लागावा आणि उरल्या वेळेत तिनं जरूरीची कामं करावीत, हे रास्त आहे, नाही का ? बेसावध सवर्यींनी ते अवघड केलं आहे. म्हणून कल्याण साधण्यासाठी प्रश्न आहे, ती वाचा 'कशी लागे तुझिया छंदा' ?

-- ८ --

नयनश्रवण दोन दोन ।
जीभ एक केली दान ।।१।।

तिला कामेही अनेक ।
त्यांत वाचेचे हे एक ।।२।।

निंदादंभ आत्मस्तुती ।
खर्ची वाचेची संपत्ती ।।३।।

देवा प्रपंचे भक्षिली ।
तुझ्या वाट्या नाही आली ! ।।४।।

दीन म्हणे रे मुकुंदा ।
कशी लागे तुझिया छंदा ? ।।५।।

-- ९ --

विज्ञान आलं. वैज्ञानिक पद्धती आली. विचार करण्यात तर्कशुद्धता आली. अनेकांची कल्पना हे सारं गेल्या चारपाचशे वर्षांत जन्माला आलं, तेही परदेशात जन्माला आलं, आपण त्याबाबतीत फार मागं होतो-अशी आहे. विचार केला तर लक्षात येईल की, हे सारं पाचशे वर्षातलं तर नव्हेच, हजारो वर्षांपूर्वीच्या उपनिषदांपासून आपल्याकडं आहे. पाचशे वर्षांत या वैज्ञानिक पद्धतीत नवीन काय आलं, तर तिचा संशोधनानं यंत्रं-तंत्रज्ञान-सुखसाधनं यांसाठी झालेला वापर आणि त्यामुळं त्याचा आपल्या दैनंदिन जीवनाशी आलेला जवळचा संबंध. तो प्रभावी असल्यामुळं आपल्याला या कल्पना खऱ्या वाटल्या. वास्तविक, विज्ञानाची अपूर्णता यात आहे की, विभाजन, तर्क आणि इंद्रियानुभव एवढ्यापुरतंच सत्य स्वीकारणं. ती मर्यादा आता स्पष्ट होत चाललेली आहे. आपल्याकडं स्थूल जगाचा आणि आत्ता म्हटलेल्या मर्यादांपलीकडं जाऊन, सूक्ष्म जगाचा - अगदी निराकार कर्त्यापर्यंत जाऊन उलगडा आणि अनुभव - घेतला गेलेला आहे. तरीही आग्रही विज्ञान वा विज्ञानी यांसाठी, भावाच्या पांडुरंगाला क्षमाप्रार्थना आहे, 'येवो विज्ञानाची दया' !

-- ९ --

जग ठासून भरलेले ।
म्हणती नाही कुणी केले ।।१।।

आम्हा कळेना जे काही ।
वाटे जगती कोठे नाही ।।२।।

जगी कर्म कण नाही ।
ज्याचा कर्ता ना कुणीही ।।३।।

मुके वासरू जाणते ।
आई आई हंबरते ।।४।।

दीन म्हणे पंढरिराया ।
येवो विज्ञानाची दया ।।५।।

याच तथाकथित वैज्ञानिक पद्धतीचा एक आविष्कार म्हणजे मला जे दिसत नाही, कळत नाही, मी पाहू शकत नाही, ते नाही, असं मी समजतो. अशाच निष्कर्षाच्या अपुऱ्या पद्धतीनं 'माझ्या मापात बसेना, देव कोठेही असेना' असा निष्कर्ष निघू शकतो. विज्ञानाच्या प्रभावाखाली एका अर्थानं भाबडेपणानं जगणाऱ्या माणसांना असा निष्कर्ष बरोबरही वाटतो. पण जर खरीच शुद्ध वैज्ञानिक पद्धत असेल, तर ती आपल्या ज्ञानाची साधनं आणि त्यांच्या मर्यादा, ते वापरणारी बुद्धी, तिच्या मर्यादा हे ओळखू शकली पाहिजे आणि गृहीत धरू शकली पाहिजे. असंच खऱ्या शुद्ध तर्कानं पुढं चाललं तर लक्षात येईल की, काही गोष्टी या मानवी आकलनाच्या, बुद्धीच्या पलीकडच्या आहेत. अशा काही गोष्टी, मानवी बुद्धी ओलांडणाऱ्या संतांना किंवा तत्समम व्यक्तींना कळू शकतात. निदान आपल्याला त्याचा अनुभव आल्यास प्रमाण मानावा, त्यांचं प्रमाण मानावं, अनुभवासाठी त्यांनी दिलेलं साधन करावं, अनुभवाची प्रतीक्षा करावी. पण या शुद्ध भावाच्या आणि अनुभवाला येणाऱ्या देवाच्या बाबतीत निदान, तो नाही, असा बुद्धिभेद होऊ देऊ नये, करू नये !

-- १० --

थेंब सागरा मोजितो ।
गणिते कसलीशी मांडितो ।।१।।

अपुले अंतर ज्या समजेना ।
ज्ञानमर्यादा जाणीना ।।२।।

घेतो अनंताचे माप ।
देतो निष्कर्ष नि:शंक ।।३।।

माझ्या मापात बसेना ।
देव कोठेही असेना ! ।।४।।

दीन म्हणे बा विठ्ठला ।
बुद्धी जाणो हा गलबला ! ।।५।।

-- ११ --

प्रगतीला सर्वांत मोठी अडचण आणणाऱ्या अहंकाराचा विचार अकराव्या आणि बाराव्या अभंगात केला गेला. प्रपंचातल्या बारीकसारीक कर्तृत्वांचं अनेकांना स्वतःलाही नकळत कौतुक वाटतं आणि इतरांनीही ते करावंसं वाटतं. वास्तविक, तसे प्रपंच सगळ्यांचेच असतात. त्यात होणाऱ्या गोष्टीही थोड्याफार फरकानं त्याच असतात. त्यात पुन्हा खरंतर अंतिम कर्तृत्व आपल्याकडं नसतंच. पण मनाला अहंकाराची एवढी ओढ आहे की, ते मन, कुणी दाद दिली नाही, तर हे कर्तृत्व आपण होऊन दुसऱ्यांसमोर मांडायला आपल्याला लावतं आणि ते आपल्या लक्षातही येत नाही. यात मन एवढंच करून थांबत नाही, तर ते असं करण्याला रास्त समजतं ! जिथं देवाच्या कर्तृत्वाचा संबंध आहे, तिथं हे मनाला कळू शकतं की, अवघं जग त्याच्या कर्तृत्वानं भरून राहिलेलं आहे. आपण आपल्या कर्तृत्वाची पाटी लावावी, डंका मिरवावा तसा तोसुद्धा काहीतरी करीतच असेल, नसेल तर ते त्याचं कर्तृत्व नसेल ! इतक्या विपरीत विचाराला जाऊ शकणाऱ्या मनासाठी दयाघन परमेश्वरालाच मार्ग विचारताना म्हटलं आहे, 'कसे कळावे या मना' ?

-- ११ --

माझ्या कर्तृत्वाची पाटी ।
मीच लावितो शेवटी ।।१।।

कधी तीही वाट न पाहे ।
डंका आधी देत आहे ।।२।।

जीव आकाश धरणी ।
करता येईना मोजणी ।।३।।

वाटे इतके जो करील ।
कशी पाटी न लावील ? ।।४।।

दीन म्हणे दयाघना ।
कसे कळावे या मना ? ।।५।।

जिथं कर्म आणि कर्तृत्वाचा प्रश्न आहे, तिथं जर शांतपणे, तटस्थपणे आणि पूर्ण भावानं विचार केला, तर लक्षात येतं की, आपण एखादं छोटंसं घर थाटावं आणि ते करण्यात आपलं आयुष्य जावं. त्या तुलनेनं कळायलाही अत्यंत अवघड, किंबहुना कल्पनेपलीकडचं, भगवंताचं कर्तृत्व आहे. आपली कर्तृत्वं सामान्यतः स्वतःसाठी आहेत. त्यात बराचसा साचेबद्धपणा आहे. पण हेच देवाचं कर्तृत्व मात्र प्रतिभेचं आहे. विलक्षण कलात्मक आहे. ते विश्वाकार आहे. शिवाय ते आपणा सर्वांसाठी आहे. इतकंच नाही, तर ते तसं चालावं यासाठीही त्याची सत्ता अविरत दक्ष आहे. ज्याअर्थानं माणसाला स्वतः केलेली एखादी गोष्ट सांगावीशी वाटावी, त्याचा अहंकार वाटावा, त्याअर्थानं तर अशा अतर्क्य कर्तृत्वाचा धनी पराकोटीचा निरहंकार आहे. देव हा आदर्श आहे, तो या सगळ्या अर्थांनी. पण त्यामुळंच तो अनेकांना जाणवतही नाही, अनेकजण तर तो नाहीच म्हणतात. जे सत्य आहे आणि लक्षात ठेवल्यानं माझंच भलं होणार आहे, ते या सगळ्या मतमतांतरात निदान, माझं तरी विसरू नये, म्हणून देवालाच प्रार्थना केली आहे, 'हाती मज दृढ धरा' !

-- १२ --

विश्वाकार अवघी कला ।
देशी थाटून सकळा ! ।।१।।

अवघे चालण्याचा भार ।
प्रतिक्षणी तुझ्यावर ।।२।।

निरहंकाराचा आदर्श ।
तुझा जाणवतो थोड्यांस ।।३।।

देव नाही म्हणती काही ।
येरा जाणीवचि नाही ! ।।४।।

दीन म्हणे विश्वंभरा ।
हाती मज दृढ धरा ! ।।५।।

-- १३ --

देव नाकारणारी काही माणसं आहेत. ते नाकारण्यामुळं घडणाऱ्या चांगल्या गोष्टींचा आणि ते नाकारण्यात असलेल्या धोक्यांचा विचार या अभंगात आहे. अनेकजण देव मानतात ते, त्यांची कामं व्हावी, लोकांनी चांगलं म्हणावं, भय दूर व्हावं म्हणून. त्यांच्या भक्तीची अवस्था ही, आपलं काम करायला मोलानं एखादा नोकर ठेवावा तशी आहे. हे अर्थातच उचित नाही. त्यामुळं देव न मानणाऱ्यांना या चुकीच्या, ढोंगी भक्तीचा दोष लागत नाही, ही त्याची चांगली बाजू आहे. हे करणारी मंडळी सावध, विचारी, विवेकी असतात. पण विचार केला तर, हेही लक्षात येईल की, एकवेळ देव नाही म्हणणं सोपं आहे, देवाच्या चुकीच्या कल्पना दूर करणं, हेही काम सोपं आहे पण, ही कामं अखेर नकारात्मक आहेत. एखाद्या शेतातलं तण काढण्यासारखं ते काम आहे. तण काढल्यानं पिकाला धोका होत नाही, हे खरं. पण तण काढून पीक येत नाही, हेही खरं. मूळ पीक हे दैवीगुणांचं आहे. ते देवत्व पिकवण्यासाठी, पुन्हा देवत्व मानून दैवी गुण पेरावेच लागतात. म्हणून प्रार्थना आहे की, 'यांना द्यावा पेरा खरा'!

-- १३ --

जे जे नाही म्हणती देव ।
त्यांचा एक बरा भाव ।।१।।

देव नोकर त्यांचा नाही ।
करण्या प्रपंचाचे काही ।।२।।

ढोंग टळे भक्तीमधले ।
अंधश्रद्धा भ्रमही गेले ।।३।।

तयार शेत विवेकाचे ।
फक्त काय पेरायाचे ? ।।४।।

दीन म्हणे रे दातारा ।
यांना द्यावा पेरा खरा ।।५।।

देव आहे म्हणणारे, सांगणारे यांच्या बाजूलाही विचार करण्यासारख्या, सावध राहण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. त्या या अभंगात थोडक्यात मांडल्या आहेत. देव हा अनेकांचा सांगण्या-बोलण्यापुरता विषय आहे. अनेकांना भविष्याची चिंता, भयं आहेत, त्यापासून सुटण्यासाठी ते देव मानतात. देवाचं देऊळ करून त्यानिमित्तानं मोठेपणा, मालमत्ता, पैसा अशा गोष्टी साधणारेही कमी नाहीत. भय असो, काम असो, दुर्बलता असो, अस्वस्थता असो - अनेक कारणांसाठी स्वतः विवेकानं कष्ट करून, देवावर शुद्ध श्रद्धा ठेवून, परिस्थितीला सामोरं जाण्यापेक्षा, अशा देवळातल्या देवाच्या गळ्यात, हे सारं टाकून मोकळं होणं, सोपं पडणारे लोक खूप असल्यानं, असं देऊळही खूप चालतं ! संतांनी अत्यंत तळमळीनं ग्रंथ -गाथा लिहिल्या असल्या तरी, त्यांतली तळमळ, अर्थ घेऊन, देवाची ओढ लागणारे आणि उपासना करणारे कमी असतात. उलट या वाङ्मयाचा भजन, निरूपणाला वापर करणारेच जास्त. ही परिस्थिती लक्षात घेऊन, शुद्ध भक्तीची कास धरावी, हा या अभंगाचा सावध करणारा अभिप्राय आहे !

--१४ --

शब्दज्ञानी, व्यवहारी ।
तुम्हा मांडिती बाजारी ।।१।।

भयापोटी कोणी भजती ।
कुणा देखाव्याची प्रीती ।।२।।

घंटा झांजा आरती टाळ ।
अगम्य घालावा गोंधळ ।।३।।

कोण कोणा म्हणे काय ।
न कळे अर्थ काय होय ।।४।।

दीन म्हणे परमानंदा ।
तुमच्या नावे तरतो धंदा ।।५।।

-- १५ --

या अभंगात एका नेहमीच्या विषयाचा पण वेगळा विचार मांडलेला आहे. हे अनेकदा लक्षात येत नाही की, जगात मध्यम प्रकारच्या कुवतीचे लोकच जास्त असतात. ते त्यामुळंच चांगल्यानंही प्रभावित होऊ शकतात आणि वाईटानंही. खूप शुद्ध आणि खूप अशुद्ध लोक कमी असतात पण ते या लोकांना प्रभावित करू शकतात. संख्येनं खूप असल्यामुळं उरलेल्या थोड्या चांगल्या किंवा वाईट लोकांनाही या मध्यम लोकांना मानूनच चालावं लागतं. सर्वसाधारण माणसं शक्तिबुद्धिनं बेताची असतात. बेसावध असतात. त्यांच्यात देहबुद्धी आणि इंद्रियांचा जोर असतो. अर्थात या सगळ्यामुळं त्यांना सूक्ष्म जग, समग्रता, देव यांच्या मूळ कल्पनांपर्यंत जाणं जमत नाही, गरजेचंही वाटत नाही. उलट त्यांना त्याही गोष्टी त्यांच्या बुद्धीप्रमाणं 'खूप सोप्या' वाटतात! इथं असा विचार केला आहे की, यात तसं चूक काही नाही. फक्त या असंख्य मध्यम लोकांना जर खऱ्या, शुद्ध देवाची ओढ लागेल, तर त्यात त्यांचं कल्याण होईल, वाईटाकडून त्यांचा वापर होणार नाही. ती कृपा देवानं करावी, यासाठी म्हटलं आहे की, 'लागो यांना तुमचा लळा'!

-- १५ --

बहुत लोक हे मध्यम ।
त्यांना वाटे सोपे काम ।।१।।

सदा वाण सावधतेची ।
शक्तीबुद्धीही बेताची ।।२।।

इंद्रियांचा कारभार ।
देहबुद्धीचाही जोर ।।३।।

परी संख्येने हे थोर ।
म्हणुनी अंकित सावचोर ।।४।।

दीन म्हणे रे कृपाळा ।
लागो यांना तुमचा लळा ।।५।।

विज्ञानाच्या प्रगतीनं खूप सुखसोयी झाल्या खऱ्या, पण ती साधनं वापरणाऱ्या माणसाचा विवेक त्याच प्रमाणात प्रगत झाला नाही. त्यामुळं विज्ञान काही चांगल्या गोष्टी घडवताना मूळ सृष्टिचक्र बिघडवत आहे, हे त्याच्या लक्षात येऊ शकलं नाही. त्यामुळं ही बिघडलेली चक्रं दुरुस्त करण्यासाठी आता पुन्हा संशोधनं करण्याची वेळ आली. आजारावर औषधं मिळाली पण त्याचे उपयोग होताना इतर आजार निर्माण व्हायला लागले. अनेक सुखसाधनं हाती घेताना, त्याबरोबर सक्तीनं नको असलेल्या विघातक गोष्टीसुद्धा, विज्ञान माथी मारू लागलं. निसर्गानं मृत्यू येणं, कधी रोगानं मृत्यू येणं हे बरं म्हणायची वेळ यावी, इतके मृत्यू आता औषधांच्या साइड इफेक्टमुळं निर्माण होणाऱ्या आजारांनी घडायला लागले. कुणा सामान्य माणसाच्या हाती यावरचे उपायही राहिले नाहीत. एक हताशपण सर्वत्र जाणवू लागलं. हे दुरुस्त करू शकणारे थोर लोक कधी जागे होतील तेव्हा होवोत, पण आता हताशपणे देवाला एवढीच प्रार्थना करता येते की, त्या देवाची 'हीच दया, जन्ममृत्यू हाती तुझिया'! त्या देवानंच आता मार्ग काढावा.

-- १६ --

सुखसोय विज्ञानाची ।
चुके वाट विवेकाची ।।१।।

सुख आधी देई हाती ।
आता नको तेही माथी ।।२।।

सृष्टीचक्रे बिघडवीती ।
वरी उपाय शोधीती ! ।।३।।

पूर्वी रोगे देह जाई ।
आता 'मदत' औषध देई ! ।।४।।

दीन म्हणे हीच दया ।
जन्म मृत्यू हाती तुझिया ! ।।५।।

-- १७ --

स्वार्थ, अहंकार याबरोबरच माणसाचा आणि व्यवहाराचा केंद्रबिंदू बनलेल्या आणि शेवटी सर्वनाश घडवू शकणाऱ्या पैशाबद्दल सावध करणारा हा अभंग. व्यवहाराच्या उपयोगासाठी एक साधन म्हणून, दाखल करून घेतलेला हा पैसा, आता माणसाच्याच डोक्यावर बसला आहे. माणसाचं आयुष्य ज्यानं सुखासमाधानाचं होतं असे नातेवाईक, वेगवेगळे संबंध, कला, साधना, अंतिमतः ईश्वर-हे सगळं ज्याच्यापुढं आता माणसाला फोल वाटायला लागलं, त्या पैशासाठी माणूस आता देवानं फुक्कट दिलेला देहसुद्धा, स्वास्थ्य न पाहता पैशासाठी रात्रंदिवस राबवायला, विकायला तयार झाला. प्रत्येक व्यवहार करताना, वागताना त्यामागं मला पैसा मिळेल ना, निदान त्याचं नुकसान होणार नाही ना, हा विचार नकळत पक्का होत गेला. त्यापोटी कुठलंही नातं, उपकार, दयाळू परमेश्वर तो विसरायला-तोडायला तयार झाला. सारे पैशाचे सांगाती झाल्यामुळं, निर्धनाला आता देवाशिवाय कुणाचा आधार उरला नाही. देव श्रीमंती देवळात डांबून त्याच्या 'दर्शनाही आता पैका'! लागावा, एवढी मजल या पैशानं गाठली. याबद्दल जाणत्यांनी तरी सावध व्हावं!

-- १७ --

पैसा मानवाचा दास ।
आता मुकुट मस्तकास ।।१।।

पैसा फेकतो तयास ।
देह देती रात्रंदिवस ।।२।।

जुळतीतुटती नातीगोती ।
अवघे पैशाने मोजती ।।३।।

निर्धनाचे कुणी नाही ।
एक देवाविना पाही ।।४।।

दीन म्हणे सर्वात्मका ।
दर्शनाही आता पैका ।।५।।

पूर्वीचे लोक अज्ञानी, भाबडे होते म्हणून देवाच्या कल्पना त्यांनी शोधल्या आणि त्यामुळं देवाचा आढळ जास्त होत होता, असं मत अलीकडं मांडलं जातं. पण लोकांनी स्थूल जग, त्यातली सुखदुःखं ओलांडली होती, ते सूक्ष्माचा-देवाचा आनंद घेऊ शकत होते. तिथून मागं येऊन सोप्या स्मरणासाठी त्यांनी महाभूतं-सगुण देव मानले. त्याची त्यांना जाणीव होती. हे ऐतिहासिक सत्य आहे. देहाच्या सुखसोयींच्या, वेळी घातक, वाढीनं सूक्ष्माची क्षमता गेली. सगुणाचा अर्थ कळेनासा झाला. ही आजची वस्तुस्थिती आहे. लोभ, व्यसन, स्पर्धा, असूया, पैसा ,चैनी यांनी दृश्य जगातल्या सुखसाधनांच्या स्पर्धांत माणसाला अडकवलं आहे. त्यामधून येणाऱ्या अशांतीचीसुद्धा लोकांना सवयच नव्हे, तर आवडही लागली. त्याचा परिणाम म्हणून शांत जीवन, शांताकार परमेश्वर त्यांना आता अळणी, नीरस वाटायला लागला. सूक्ष्माचं आकलन यात हरवल्यामुळं, अशांतीच्या प्रपंचाची आग जणु ,निश्चिंत राहून घ्यायची ऊब वाटू लागली ! स्थूलात रमण्यानं होणारं नुकसान दृष्टिआड झाल्यानं सूक्ष्म, शांत ईश्वराची आराधना लोपली. त्यामुळं 'तुजला नसे थारा'! अशी देवाची अवस्था झाली !

-- १८ --

लोक राहाती निश्चिंत ।
प्रपंचाच्या या आगीत ।।१।।

रोग, वेग कमी पडती ।
लोभ, व्यसनेही आणिती ।।२।।

स्पर्धा, असूया, मत्सर ।
पैसा, चैनींचीही भर ।।३।।

शांत जीवन जनांस ।
अळणी वाटते नीरस ।।४।।

दीन म्हणे शांताकारा ।
म्हणुनी तुजला नसे थारा ! ।।५।।

-- १९ --

आजच्या समाजजीवनाचं चित्र या अभंगात आहे. पैसा, सत्ता, लोभ, संचय यांनी असंख्य माणसांची मनं इतकी ग्रासलेली आहेत की, स्वाभाविकपणे त्याचा परिणाम, ते ज्या क्षेत्रात वावरतील, त्या क्षेत्रावर झाला आहे. मग स्वाभाविकपणे दर्जा-सचोटी-सत्य-गुण यांची किंमत न उरता, व्यवहारात पैसा, सत्ता, प्रतिष्ठा यांची चलती झाली. इतकंच नव्हे, तर कुठलंही काम पैशासाठी, सत्तेसाठी आणि पैशानं किंवा सत्तेनं करून घेण्याकडं कल वाढला. त्यात वाईट हे की, त्याला प्रतिष्ठाही मिळाली. त्यामुळं शिक्षण, व्यवसाय किंवा रक्षण, न्याय, शासन-अशा कुठल्याही क्षेत्रात पैसा, सत्ता यानं काम करून घेण्याची सवय लागली. पगाराशी प्रामाणिक काम, कामातली गुणवत्ता, शुद्ध न्याय, साऱ्या शासनयंत्रणेतल्या व्यवस्थापनातली प्रामाणिकता-असे गुण हिताचे असूनही आता मागं पडू लागले. किंबहुना, ते मानणारेही या साऱ्या क्षेत्रात मागं पडू लागले. त्यातून काहींनी गुणांना किंमत मिळते म्हणून परदेशी जाणं पत्करलं. या दुर्दैवी पार्श्वभूमीवर सद्‌गुणांचा मूलाधार असलेल्या देवालाच कळकळीची प्रार्थना आहे की, 'नको त्यागू अमुच्या देशा'!

-- १९ --

कुठले क्षेत्र हे शोधावे ।
जेथे व्यवहारे तोषावे ।।१।।

असो रक्षण वा न्याय ।
किंवा शिक्षण, व्यवसाय ।।२।।

चाले बोले पैसा, सत्ता ।
कोणी बोलेना गुणवत्ता ।।३।।

ज्याला थोडे त्याचे आहे ।
भला परदेशी तो राहे ।।४।।

दीन विनवी गुणाधीशा ।
नको त्यागू अमुच्या देशा ।।५।।

-- २० --

निःस्वार्थ, परोपकार, कामातली-व्यवहारातली प्रामाणिकता, देशासाठी त्याग, देवाची निरपेक्ष भक्ती-अशा गोष्टी समाजातून लोप पावल्या आणि सारा स्वार्थ-पैशाचा मामला झाला की, समाजजीवन निकृष्ट होतं. त्याचा परिणाम स्वाभाविकपणे सामान्य माणसांच्यावरही होतो. त्यांनाही स्वतःला असं वाटू लागतं की, मीसुद्धा, मला काही कमी पडू नये, एवढाच विचार करावा. पोटपाण्याला कमी पडू नये, माझ्या डोळ्यांना, कानांना रंजन झालं म्हणजे झालं, मला स्वतःला उत्तम बंगाल-गाडी, मनासारख्री चैन करायला पैसा असला म्हणजे पुरे झालं-असं बहुसंख्य लोकांना वाटू लागतं. अर्थातच यादृष्टीनं पाहिलं की, निरपेक्ष सेवा, ज्ञानप्राप्ती, ज्ञानदान, देवभक्ती- अशा गोष्टी करणारे लोक, नुसतेच चुकतात असं नव्हे, तर त्यांना व्यावहारिक शहाणपण नाही, असंही वाटायला लागतं. खरंतर स्वार्थी समाज, बेसावध व्यक्तिजीवन यांचा हा सारा दुष्परिणाम आहे. त्यानं शेवटी सर्वांनाच अशांती आणि दुःख पदरात पडणार आहे, हे नक्की असून, ते दिसत नाहीसं होतं. डोळ्यांवर जणू सारा आल्यासारख्री अवस्था होते. म्हणून म्हटलं आहे की, 'अंजनाची करा वृष्टी'!

-- २० --

पोट, डोळे तृप्त कान ।
मला कोठे नसो न्यून ।।१।।

दृष्टी जाते एवढीच ।
गाडी बंगला खर्चवेच ।।२।।

देव भाबड्यांचे काम ।
आम्ही विज्ञानी परम ।।३।।

देशसेवा, ज्ञानार्जन ।
वेडे करती ते चुकून ।।४।।

दीन म्हणे रे जगजेठी ।
अंजनाची करा वृष्टी ! ।।५।।

-- २१ --

या अभंगापर्यंत आजच्या समाजाच्या आणि व्यक्तीच्या जीवनाचं चित्र पाहिलं. त्यात अस्वास्थ्य, अशांती, चुकीच्या गोष्टी का, कशा आल्या, तेही पाहिलं. अर्थात हे नुसतं पाहून त्यावर मार्ग निघणार नाही. त्यासाठी आणखी काही विचार आणि काम करावं लागेल. त्याची दिशा दर्शवणारे अभंग इथून सुरू होत आहेत. त्यात सर्वांत पहिलं काम म्हणजे निःस्वार्थीपणे, आळस न करता अखंडपणे आपल्या खऱ्या स्वधर्माचं कर्म सुरू करणं ! स्वास्थ्याच्या जीवनासाठी एकाच नव्हे तर दोन्ही हातांनी जरूर काम करावं, पण ते इतरांना जगवण्यासाठी, परोपकारासाठी, आपलं कुणावर ओझं होऊ नये, यासाठी करावं. स्वार्थीपणे स्वतःच्या पोटासाठी जिवापाड श्रम करणाऱ्या पशुजीवनापेक्षा हे नक्की श्रेष्ठ जीवन आहे. मनुष्यजीवन आहे. देवत्वाकडं नेणारं जीवन आहे. स्वतः प्रामाणिक कष्टानं पोटासाठी जगणं, त्यासाठी श्रम करणं याचबरोबर, किंबहुना त्यापेक्षा जास्त श्रम, हे स्वधर्मामध्ये दुसऱ्याला-सृष्टीला-पशुपक्ष्यांना जगवण्यासाठी घडतात. अशा स्वधर्माच्या वाटचालीनं जिवाला देव कळतो, प्रिय होतो आणि असा जीव 'प्रिय तोही होतो त्याचा' !

-- २१ --

आळसाचे नाही काम ।
अखंड कर्म हाचि धर्म ।।१।।

स्वधर्माचे कर्म तेही ।
नव्हे पोटासाठी काही ।।२।।

करी श्रम दोन्ही हाती ।
तेणे दुसऱ्याही जगवीती ।।३।।

उगा उपकार घेईना ।
ओझे कोणासी होईना ।।४।।

दीन म्हणे तो देवाचा ।
प्रिय तोही होतो त्याचा ।।५।।

-- २२ --

दिवस उजाडल्यापासून आपल्याला असंख्य कामं करावी लागतात. त्यांतली बरीचशी दृश्य-स्थूल स्वरूपाची असतात. आपली कामांकडं बघण्याची दृष्टी जर एवढीच राहिली, तर आपल्याला अदृश्याकडं-सूक्ष्माकडं जाण्याची जी शक्ती आहे, जिनं देव कळतो-सापडतो, ती गमावली जाईल. आपण कामं करतो खरी, पण ती दिसायला स्थूल असली तरी करायला एक प्रेरणा लागते. ती सूक्ष्म आहे. ती प्रेरणा मनाकडून मिळते. जे अव्यक्त आहे-दिसत नाही. काम करणारा देह दिसतो, पण त्याच डोळ्यांना तसं काम करायला प्रेरणा देणारं मन दिसत नाही. त्याची प्रेरणा नसली, तर यातलं कामही होत नाही. हे पाहण्याची दृष्टी जर आपल्याला आली, तर आपलंच काम नव्हे, तर साऱ्या जगात जी कर्मांची अविरत, अगणित घडामोड चालू आहे, तिच्यामागं प्रेरणा देणारं काही असलं पाहिजे, हे लक्षात येतं. त्याचबरोबर ही प्रेरणा आणि दिसणारी कर्मं यांची यथायोग्य सांगड घालणारी त्याहूनही सूक्ष्म, अव्यक्त यंत्रणा असली पाहिजे, हे कळतं. म्हणून स्थूल कर्मं करावी-पहावी, पण त्यातून अव्यक्त-सूक्ष्म प्रेरणा-कर्ता हेही 'शोधावे दिननिशी'!

--२२ --

पाहू आपुला अनुभव ।
थोडा जाणावया देव ।।१।।

देह पाहाती जरि डोळे ।
मन शोधूनी ना मिळे ! ।।२।।

परी ठरवी मन तैसे ।
देह चाले, बोले, बैसे ! ।।३।।

तसे चाले जग स्थूल ।
सूक्ष्म देव जे ठरवील ।।४।।

दीन म्हणे अव्यक्तासी ।
म्हणुनि शोधावे दिननिशी ! ।।५।।

-- २३ --

कर्मं करता करता मुक्त होण्यासाठी जे सावध चित्त लागतं, त्याचा परिचय आणि गरज या अभंगात व्यवहारातली उदाहरणं देऊन स्पष्ट केली आहे. व्यवहारात एखादी वस्तू कमी पडली, तर ती आपण दुसऱ्याकडून उधार आणतो, काम झालं की, ती परतही करतो, करावी. जसं पैसा कमी पडला, तर कुणाकडून कर्जाऊ घेऊन, काम झालं की, तो परत करतो त्यावेळी, त्यावर पैसा वापरायला मिळाल्याबद्दल, व्याजही देतो. पारमार्थिकदृष्ट्या आपल्या देहाची अवस्था अशीच आहे. आपण केलेल्या कर्मांत सावधानता, कौशल्य नसतं, म्हणून परिणामांचं प्रारब्ध निर्माण होतं. काळाच्या नियमानं देह पडतो पण परिणाम सोसायचे राहिल्यानं, ते सोसण्यासाठी उधारीनं देह आणावा लागतो. तो घेऊन प्रारब्ध फेडण्याचं काम झालं की, उधार वस्तू परत द्यावी तसा, तो कृतज्ञतेनं निसर्गाला, परत द्यावा. प्रारब्धाचं कर्ज फिटल्यावर देह राहिलाच असला, तर निरपेक्ष सत्कर्मं करून, त्या रूपानं या कर्जावरचं व्याजही समाजाला-निसर्गाला अगत्य द्यावं. या सत्कर्मांत, पुन्हा नवीन प्रारब्ध निर्माण न होण्यासाठी, चित्ताला सावधानतेनं बजावावं लागतं 'नवे कर्म नको आता'!

-- २३ --

ज्याचे आणिले उधार ।
परत व्हावे हा व्यवहार ।।१।।

प्रसंगी घेतले जे कर्ज ।
जग घेतसे सव्याज ।।२।।

देण्या कर्ज प्रारब्धाचे ।
देह आणिती उधारीचे ।।३।।

परत द्यावे फिटता कर्ज ।
वरी सत्कर्मांचे व्याज ।।४।।

दीन म्हणे सावध चित्ता ।
नवे कर्म नको आता ।।५।।

देव या 'सत्या'बद्दल, ती 'कल्पना' समजून, अनेक मतं, विवाद केले जातात. त्यात ती संकल्पना नीट न कळणं, हेही कारण असतं. सामान्य माणसाला हा सारा तार्किक प्रवास न समजणारा ठरतो. एवढ्यामुळं, त्याला खरा देव दुरावू नये म्हणून, एका सोप्या उदाहरणानं देव समजावून देण्याचा प्रयत्न या अभंगात आहे. त्यासाठी सर्वांत प्रथम लक्षात घ्यावं लागतं की, डोळ्यांना दिसलं तरच ते असतं, ही कल्पना अपूर्ण आहे. एखादी गोष्ट डोळ्यांना दिसत नाही, म्हणून त्यांना दोष देण्याचंही कारण नाही. जाणण्याच्या, समजून घेण्याच्या गोष्टी या डोळ्यांच्या, इंद्रियांच्या क्षमतेच्या पलीकडं आहेत, हे समजून घ्यावं. आईचं प्रेम, सहानुभूती, करुणा अशा अनेक गोष्टी न दिसतासुद्धा आपण जाणतो. त्यावर व्यवहार चालतो. माणसाला आयुष्यात जसा आनंद होतो, पण तो डोळ्यांना दिसत नाही, तरी तो खरा आहे, हे आपल्याला कळू शकतं. तसं आपल्याला न दिसणाऱ्या देवाचं स्वरूप आहे. तो दिसत नाही, तरी असतो आणि जाणवतो. आनंदासारखं देवाचं स्वरूप इंद्रियापलीकडचं असलेलं, न दिसणारं पण जाणवणारं आहे, एवढं समजून घ्यावं, वाटचाल करावी !

-- २४ --

देव दिसेना डोळ्यांना ।
नका दोष देऊ त्यांना ।।१।।

जेथे जाणायाचे काम ।
तेथे इंद्रिये अक्षम ।।२।।

कर्म विश्वाकार ज्याचे ।
तेही आटोक्यापलिकडचे ।।३।।

कुठे आनंद ना दिसतो ।
परी जीवांना जाणवतो ।।४।।

दीन म्हणे रे देवाचे ।
तसे थोडे आहे त्याचे ! ।।५।।

-- २५ --

ज्यांच्या दृष्टीनं जगणं म्हणजे शिक्षण, नोकरी, धंदा, घरदार, मुलंबाळं आणि एक दिवशी जाणं एवढंच मर्यादित आहे, त्यांना माणसाच्या जीवनाची आणि त्यातल्या पूर्णत्वाच्या शक्यतेची कल्पना आलेली नाही, हे भक्तांनी लक्षात घ्यावं. तसे लोक जगामध्ये राहणारच. त्यांना सांगायला जाऊ नये. आपण लक्षात ठेवावं की, देवत्वाचं परिमाण, देवत्व, माणसाच्या आयुष्यात येतं, तेव्हा मानवी जीवनाचं सार्थक होतं, त्याला पूर्णता येते. अगदी तसाही विचार केला, तर कुणाचाच प्रपंच पूर्ण झाला नाही, होणारही नाही. सगळ्या सृष्टीतसुद्धा एक प्रकारची अपूर्णता, अशाश्वतता भरून राहिलेली आहे. त्यात देवाचं स्मरण, त्याचं खरं कर्तृत्व लक्षात आलं की, तोच प्रपंच, तीच सृष्टी पूर्णतेचा सोहळा अनुभवू शकते. संकुचित दृष्टीनं जगणारे अगणित जीव येतात, प्रपंच करतात आणि संपूनही जातात. ते तर उरत नाहीतच, त्यांचं नावही उरत नाही. हे लक्षात घ्यावं की, शाश्वत देव मात्र स्वतःही आणि त्याच्या नामाच्या रूपानंही आधी होता, आत्ता आहे आणि पुढं राहणार. त्या अर्थानं इथं म्हटलं आहे, हे देवाचं स्वरूप लक्षात घेऊन जो जगतो, 'तोचि शोभतो मानव'!

-- २५ --

येता परिमाण देवाचे ।
होई सोने आयुष्याचे ।।१।।

धाक वाटो वा आधार ।
देव स्वहिताचा ठरणार ।।२।।

अपूर्ण सृष्टीचा सोहळा ।
देव येता पूर्ण कळा ।।३।।

बाकी अवघे येती जाती ।
देव उरतो आदीअंती ।।४।।

दीन म्हणे जाणी देव ।
तोचि शोभतो मानव ! ।।५।।

-- २६ --

ज्या देव आणि देवत्वानं आपल्या आयुष्याला पूर्णता येते, त्याचं सोनं करता येतं, त्या देवाचा आपला संबंध कोणता, तो देव कुठं आढळू शकेल, हा संबंध आपल्याला टिकवता कसा येईल, याचा विचार या अभंगात केला आहे. एक लक्षात ठेवावं की, मानवी तर्कानं देवाच्या गाभाऱ्यापर्यंत पोचता येतं पण आत प्रवेश करता येत नाही आणि दर्शनही होत नाही. त्यासाठी लौकिकानं संबंध जोडताना जसं काही द्यावंघ्यावं लागतं, त्यामार्गानंही हा संबंध-दर्शन होऊ शकत नाही. त्यासाठी त्याच्याबद्दल असलेली कृतज्ञता, आदर-प्रेमभाव याच गोष्टी उपयोगाला येतात. ज्या देहाच्या साहाय्यानं आपण हे खरे मार्ग चालणार, तो देहच त्यानं दिला आहे, तर त्याची कृतज्ञता म्हणून तरी, त्याची नामाच्या रूपानं आठवण नको का करायला, हे मनात आलं तरी पुरे. तो कुठं राहातो, हे शोधायला देवळं, यात्रा करण्यापेक्षा लक्षात ठेवावं की, सगळ्या प्राणिमात्रांवर साररूंच प्रेम करणाऱ्या भक्तांच्या हृदयात तो नक्की राहातो. म्हणून अशा भक्तांचं, सत्पुरुषांचं दर्शन घ्यावं. त्यानं आपला देवाचा संबंध दृढ होतो. ते स्मरण टिकवण्यासाठी शेवटी म्हटलं आहे, 'नाम वर्म अनुसंधाना'!

-- २६ --

ज्याची वापरतो काया ।
त्याचे नाम नको का घ्याया ?।।१।।

देव मावेना तर्कात ।
अनुसंधानी खरे भक्त ।।२।।

देणेघेणे न लगे त्याला ।
एक भाव ये कामाला ।।३।।

सकळ जीवांचे ज्या प्रेम ।
त्याच्या हृदयी त्याचे धाम ।।४।।

दीन म्हणे ऐके मना ।
नाम वर्म अनुसंधाना ! ।।५।।

-- २७ --

ज्याला देवाचं स्वरूप, महत्त्व कळलं, जीवनातलं देवाचं स्थान लक्षात आलं, त्याला हे कळतं की, जळीस्थळी, काष्ठीपाषाणी, सर्व भूतमात्रांत भगवंत भरून राहिलेला आहे. त्या भावानं त्याचं दर्शन कधीही, कुठंही घेता येतं. तरीसुद्धा चतुर्दशीच्या आणि पौर्णिमेच्या सारख्या वाटणाऱ्या चंद्रात थोडा कलेचा फरक असावा, तसा असं भावानं दर्शन घेण्यात आणि प्रत्यक्ष त्यात एकरूप होऊन जाण्यात फरक वाटतो आणि खऱ्या भक्ताची इच्छा राहातच असेल, तर ती एवढीच की, 'मिळवी मजला स्वरूपास'! सूर्याच्या प्रतिबिंबाच्या दर्शनानं सूर्याची कल्पना येत असली, त्याची खात्री पटत असली, तरी दुसऱ्या बाजूला हेही जाणवतं की, प्रतिबिंबाला स्पर्श करून सूर्याला स्पर्श होणार नाही. त्यासाठी या सबंध बोधपाठामध्ये जाग येण्यापासून अनुसंधानापर्यंत सारे टप्पे पार पडले, तरी शेवटी एक दया परमेश्वरानं करावी अशी प्रार्थना केली आहे. कारण नव्याण्णव टक्के प्रवास कटाक्षानं केला, तरी शेवटी तो प्रवास करणारा 'मी' नाहीसा करून, शेवटचा कृपेचा एक टक्का त्यांनी दिल्यावरच जिवाचा उद्धार होतो. म्हणून शेवटची प्रार्थना आहे की, 'उद्धरावे दीन जीवा' !

-- २७ --

जळीस्थळी भूतमात्री ।
भरिली देवाने धरित्री ।।१।।

तुमचे दर्शन जीवा आहे ।
तरी देवा उणे आहे ।।२।।

प्रतिबिंब धरू जाता ।
न ये सूर्य कधी हाता ।।३।।

म्हणुनि देवा आता आस ।
मिळवी मजला स्वरूपास ।।४।।

पाठाअंती दया दावा ।
उद्धरावे दीन जीवा ।। ५।।

।। विश्वात्मकाची आरती ।।

विश्वात्मका तुजला देवा ओवाळू आरती ।
तुझ्या कृपेचा सदैव होवो बोधपाठ चित्ती ।।धृ।।

१

जन्मोजन्मी प्रपंच करुनी भागलो आता ।
माझे माझे भरुनी ओंजळ मोकळी आता ।।१।।
नातीगोती मानमान्यता पैसा पोकळ ।
स्वार्थी जगती कुणी न भेटे निखळ प्रेमळ ।।२।।
कल्पनेतले मिळण्यासाठी आजवरी श्रमलो ।
ज्याची त्याची कास धरूनी दूर किती गेलो ।।३।।
चैतन्यात्मक तुझीच होती प्रेमळ संगती ।
भान तिचे मज आले आता नित्य टिको चित्ती ।।४।।

२

निसर्गातले रूप अचेतन तसे सचेतन ।
कधी थबकलो नाही घेण्या तुमचे दर्शन ।।१।।
सुष्टदुष्ट वा क्षुद्रभव्य वा ऐलपैल भासो ।
तुजला प्रिय कण विश्वामधला कुणी कुणा त्रासो ।।२।।
सर्वांचे हित नित्य घडावे हेतू तव ठायी ।
समग्रतेचे भान मला दे कृतीत अन् हृदयी ।।३।।
तुझे,तुझ्यास्तव,तव इच्छेने जगेन जीवन ।
दीन जिवांना तुझे घडू दे सदैव दर्शन ।।४।।

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
(आता डिजिटल स्वरूपात)

१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी
२. हरिपाठपराग
३. दर्शन
४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट
५. साधनपदावली
६. जपसंकल्प : स्वरूप व पद्धती
७. अभंगसाधना
८. जाग
९. जीवनजिज्ञासा
१०. विचारविश्वाची ओळख
११. चैतन्यचिंतन
१२. किमया
१३. प्रसादकण
१४. ठेवा
१५. संतबोध : भाग १
१६. संतबोध : भाग २
१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश
१९. नाम
२०. श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली
२१. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)
२२. उपासनेची नोंदवही
२३. उत्तरायण - भाग १
२४. शोध
२५. दिशा :
२६. उत्तरायण - भाग २
२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
२८. बासरी
२९. उपासना :
३०. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी
३१. कृपापदावली भाग : १
३२. कृपापदावली भाग : २
३३. साधनपदावली भाग १
३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा
३६. मेरी यात्रा (हिंदी)
३७. बोधपाठ
३८. एकाध्यायी विचारगीता
३९. सृष्टिसंदेश
४०. गुरुतत्त्वतरंगिणी
४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत
४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)
४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)
५५. शिदोरी
५६. विचारविसावा
५७. सारविस्तार भाग २
५८. महाराजांची शाळा
५९. साधनपदावली भाग २
६०. आरतीपुष्पमाला
६१. विनवणीची वाणी
६२. श्रद्धेची पहाट
६३. उपासनामाला

६४. पावनपथ
६५. अनुभवपुष्पे - भाग १
६६. कृतज्ञतामार्ग
६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात
६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी :
(मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)
६९. संतबोध : भाग ४
७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार
७१. उत्तरायण -भाग ३
७२. अनुभवपुष्पे - भाग २
७३. श्रद्धा
७४. अनुभवपुष्पे - भाग ३
७५. अर्घ्य
७६. जीवनचिंतन
७७. स्वास्थ्यसंवाद
७८. वचनांजली भाग १
७९. अक्षरायण
८०. वचनांजली भाग २
८१. भावगीता

बोधपाठाचे हे सार । काही करूया विचार ।।
पाहू शोधूनी आपण । जोडेल का नारायण ।।

एकविसाव्या शतकातील माणसाचे व परिस्थितीचे यथार्थ दर्शन घडविणारा हा नवा 'बोधपाठ' आहे. परंपरागत रचना, पद्धती व चाल त्यात सांभाळलेली असून तो अंतर्मुख करणारा आहे. ही रचना अर्थ कळून नित्य म्हटल्यास आत्मचिंतनास व विधायक कृतींस उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.

तुझ्या कृपेचा सदैव होवो बोधपाठ चित्ती ।।